# लॉकडाऊनमधील व्यक्ती आणि वल्ली

आपापले मोबाईल घेऊन सगळेजण सरसावून बसले. सगळ्यांचे डोळे होते मोबाईलच्या पडद्यावर. लिंक आली. पासवर्ड दिसू लागला. चालू करताच भाईंचे दर्शन झाले. सर्वांनी भरल्या डोळ्यांनी टाळ्या पिटल्या. भाईंनी सुहास्य वदनाने नमकार केला व सुरुवात केली.

"आज आपण एकमेकांना पाहू शकतो, संवाद साधू शकतो ही इंद्रदेवांची कृपा आहे. तुमची मला भेटण्यासाठीची सॅटेलाईटच्या माध्यमातून केलेली विनंती मी त्यांच्या कानावर घातली. त्यांनी स्वतःच्या खास तंत्रज्ञांना आज्ञा देऊन व्हिडिओ कॉंफरन्सिंगद्वारे आपली भेट घडवून आणली. त्याबद्दल त्यांचे धन्यवाद." सगळ्यांनी 'धन्यवाद'चा पुकारा केला.

ह्या कार्यक्रमासाठी अंतू बर्वेनी गेला आठवडाभर मोबाईलची कार्यवाही शिकण्यासाठी आपल्या नातवंडासमावेत रिफ्रेशर कोर्स केला होता. बबडूने तर नवाकोरा मोबाईलच घेतला होता. (खरं तर त्याला तो डीलरने दिला होता. कारण माहिती नाही.)

अन्तू बर्वेनी प्रेमळ चौकशी केली, "जावयबापू, बरे आहात ना?"

"बरा दिसतोय ना? मजेत आहे. तुमचं काय?"

"आम्ही सजा भोगतोय, कोरोना नावाच्या अतिरेक्याने दिलेली."

बबडूने सत्य परिस्थिती कथन केली.

"अरे ते साला विषाणू अँटसेबी छोटा असते. पण केटला डेंजरस असते. अँटला तो चिरडून टाकू शकते. विषाणू तो दिसतेच नाय साला. तेच्यामुळेच हे लॉकडाऊन झाला ने. हंड्रेडपर्सेंट बोअरिंग. तुजा मजा आहे रे भाऊसाब."

"आहे खरं. इकडे कोरोनाबाधितांचे मृतात्मे येतात, पण त्यांच्यासाठी निराळं दालन आहे. आमचा संपर्क येत नाही."

"म्हणजे त्यांनाही क्वारंटाईन करतात काय रे पुर्ष्या? आता कोरोनाच्या गोष्टी नको रे." चितळे मास्तरांनी शिक्षकी फतवा काढला.

"कडवेकर मामामामी शांत का बसलेत? भांडण झालय का?" भाईंना कडवेकर दांपत्याचे मौन असह्य झाले असावे.

"भाई, मी सांगून सोडतंय, आमचं हजबंड सारखं मिस्टेक करतंय. मग मी ओरडते आणि मूड जातो बघा. नायतर भांडण करत नसते मी हां." मामी.

"आमच्या शेजारीच राहतात. वारंवार तोफांचे गडगडाट ऐकू येतात."

हरीतात्यानी माहिती पुरवली.

"पुराव्याचे काय?" अन्तूकाकांचा खवचटपणा.

"घाबरतो की काय. पुराव्यानिशी सिद्ध करेन."

हरीतात्यांनी निर्वाळा दिला.
"म्हणजे हरीतात्या कडवेकरांच्या दाराला कान लावून बसताना की काय? झालं भांडण, करा रेकॉर्ड." बबडू
"अरे, तुमी लोग साला कसला डिस्कशन करते? मामामामीला बात करु दे." बावाजींचा फतवा!
"भाई, मला बोलायला, गाणी म्हणायला आवडतं हो, पण ही खूप आरडाओरडा करते. तुमचे कार्यक्रम होतात ना?" मामा.
"पेस्तनचाचा, होतात तसे अधून मधून, पण पूर्वीची मजा राहिली नाही. घरातच हार्मोनियम वाजवतो." भाई
"सुनताबाई ऐकतात ना?" मामी
"हो ना ऐकते." भाई
"मामी, ऐका. सुनितावहिनी भाईंच्या पेटी वाजवण्याची स्तुती करतात आणि तुम्ही?" मामा.
"बोल्लं, आमचं हजबंड बोल्लं. तुमची आणि भाईंची बरोबरी करतात. तुमचं रँ रँ ऐकून मी कंठाळले. ते त्रिलोकेकर सारखी कंम्प्लेंट करून सोडतात बघा." मामी.
संवादाचा विसंवाद होत असल्याचे जाणवून भाई हस्तक्षेप करतात.
"सखाराम गटणे आणि नारायण नाही आहेत का?"
"सख्या तसा वक्तशीर आहे. यावयास हवा." अंतूकाका
तेवढ्यात सखाराम पडद्यावर दिसतो.
"ए चिरगुट, कुठच्या देवळात गेला होतास?" बबडू.
"देवळात कशाला? माझा देव तर इथे आहे." भाईंकडे पाहून नमस्कार करतो. सगळे हसतात.
"ए सख्या, पुर्ष्याला देव नको करु. तो गप्प राहील. आपली करमणूक नाही करायचा." चितळे गुरुजी.
"हंड्रेडपर्सेंट करेक्ट. सखा, तू साला भाऊसाबचा बुक वाच अने तेलाच रिव्ह्यू दे नी. इकडे अलगसी वार्ता करायची हाय." पेस्तनचाचा.
"आज पहिल्यांदा राजाबाई टॉवर मुद्याचं बोलले." बबडू.
"पेस्त्या तसा बरा बोलतो हां. काय समजलेत?" अंतूकाका.
"हो तर काय? खूप पुरावे आहेत. हा बबड्या काहीही ऐकतो आणि बोलतो." हरीतात्या.
"तात्या, तुम्ही झी मराठीवरचा लाडोबा बबड्या इथे घुसवताय की काय?" भाई.
"स्कालर, माझ्या फॅमिलीमध्ये लाड करायला कोणी नव्हतं म्हणून तुझ्या घरी येऊन लाडू खायचा ना!" बबडू.
"पुर्ष्या, बबडूचे सोसायटीच्या बोर्डावर नाव पी.बबनराव असे आहे, ते पाहीलेस का?" चितळेगुरूजी.
"नाही. मी वाचलं नाही, पण बबडू आणि चितळेगुरूजी एका मिटींगमध्ये आहेत, त्याचा आनंद होतो." भाई.
"मी लांब आहे त्याच्यापासून म्हणून कान----" असे म्हणून घाबरुन कानावर हात ठेवतो. "शिंच्या

बबड्या, आता का तुझे कान पिरगळणार आहे मी? शाळेत गणिताच्या तासाला मनसोक्त पिरगळून लांब केलेत गाढवासारखे." चितळेगुरूजी.
सगळे 'खोखो' हसतात. "भाई, बबडू तुमचा बालमित्र आता नगरसेवक झालाय." कडवेकरांची माहिती.
"तरीच एवढं शायनिंग मारतोय!" भाई
"काय स्कालर, तुझ्यापुढे माझं काय शायनिंग?"
"पण बबडू सरांनी आमच्या पोटॅटो कॉम्प्लेक्स सोसायटीचं काम लवकर करून दिलं हां." सखाराम.
"ए चिरगुट, सर वगैरे शेपटं लावू नको. मला थरथरल्यासारखं होत. बबडूदादा म्हण." बबडू.
"पण पी. बबनराव ही काय भानगड आहे? बबडू तू नाव बदललस का नगरसेवक झाल्यावर?" भाई.
"नाही रे स्कालर. आपलं कोणी बारसं केलं नाही. आईला टाईम कुठे होता? कोणीतरी बबडू म्हटलं, तेच नाव पडलं. पी. म्हणजे पंडोर. आपलं सरनेम आहे. नगरसेवक झाल्यावर बबडूचं बबन केलं." बबडू.
"तुमच्या सोसायटीचं नाव काय म्हणालात?" भाई.
"आमच्या सोसायटीचं नाव आहे पोटॅटो कॉम्प्लेक्स." हरीतात्या.
"असं काय विचित्र नाव ठेवलंय?" भाई.
"अरे भाऊसाब, एटला फरगेटफुल कसा झाला तू? इथे पयलीं बटाट्याची चाळ होती ते तू विसरला काय" पेस्तनचाचा.
"अगदी मोडकळीला आली होती. मेंढेपाटलानी नूतनीकरण केले. आम्ही तिथले आधीचे रहिवासी. आणखीही आपले आप्तजन वास्तव्य करून आहेत. प्रत्येकाला वन बी. एच्. के. दिलाय." हरीतात्या.
"नूतनीकरणानंतर आम्ही मॉडर्न नाव दिलं पोटॅटो कॉम्प्लेक्स." बबडू
"वा छान. बटाट्याच्या चाळीची स्मृती राहिली." भाई
"इतकंच नाही. पुर्ष्या, तू सुध्दा आठवतोस. बरे वाटते." हरीतात्या.
सगळे "खरं आहे" असं  ओरडतात. "आता साला वार्ता खूप केला. कुछ आयटम करु ना. भाऊसाब, तुझा हार्मोनियम वाजव नी. खूप मजा येल. हंड्रेडपर्सेंट. काय दोस्त?"
"हो हो नक्कीच" सगळे ओरडतात!
भाई हार्मोनियम आणून त्यावर "झाला महार पंढरीनाथ"ची धून वाजवतात. सगळे ती ऐकून धुंद होतात. गाणे वाजवून झाल्यावर सर्वांच्या चेहेऱ्यावरुन आनंद ओसंडून वाहत असतो. भाईंना सुध्दां तृप्त वाटते.
"वा वा तब्येत एकदम खूष झाली स्कालर." बबडू.
"हां हां" म्हणून सगळे टाळ्या वाजवतात!
"सर, तुमच्या अस्तित्वानेच वातावरणात आनंद भरून राहतो." सखाराम.
"तो तू पिऊन घे, म्हणजे अंगावर जरासं मास चढेल. सुकडा बोंबील कुठला." बबडू.
सगळे हसतात.

"आज मी हार्मोनियम वाजवलं, पण इतरांनीही काही तरी केलं पाहिजे.
लॉकडाऊन हा नाईलाज आहे. तो सुसह्य करण्यासाठी आपल्याला उपाय शोधून काढला पाहिजे." भाई.
"सगळे म्हणतात कोरोना आपल्या सोबत राहणार आहे. मग करायचं काय?" चितळेगुरूजी.
"सगळी बंधनं पाळून आपले व्यवहार चालू ठेवायचे. स्वतःला कशात तरी गुंतवून ठेवायचं. घरांतली कामं करायची. तुम्ही करता की नाही?" भाई.
"मी तर नेहमीच करतो." मामा.
"बोल्लं आमचं हजबंड. भाई, हे लिस्ट घेऊन बाजारात जातं. चार पैकी दोन वस्तू घेऊन येतं. वाटेत बसतं चकाट्या पिटत." मामी.
"मामी, आता असं नाही होणार." अन्तूकाका.
"मी व्हायला देतच नाही ना." मामी.
"बरं, ते राहू दे. कोण काही कला दाखवेल का?" भाई.
"अरे भाईसाब, कोणाकडे तुज्यासारखी आर्ट नाय असते." पेस्तनचाचा.
"होय रे पुर्ष्या, सगळ्यांच्या अंगात नसते कला. तूच कर काय ते. आम्हाला बघायला आवडेल." चितळेगुरूजी.
"ते तर झालंच. पण इकडे असलेल्यांच्या अंगातही कला आहेत. बबडू नकला छान करतो. शाळेत सर्व शिक्षकांच्या नकला करून आम्हाला हसवायचा.चितळेमास्तरांची सुध्दा करायचा." भाई
"काय रे गधड्या बबड्या, जवळ असतास तर चांगला धोपटला असता." चितळेगुरूजी.
"आमचे अन्तूकाका रत्नागिरीच्या पतित पावनाच्या देवळात भजनं म्हणायचे. ऐकणाऱ्यांची ब्रम्हानंदी टाळी लागायची. काय काका, आहे का लक्षात?" भाई.
"आहे हो लक्षात जावयबापू. पण त्या रत्नांग्रिच्या भजनाचे इथे काय अप्रूप?" अंतूकाका
"प्रतिसाद जागेवर अवलंबून नसतो. तुम्ही आठवून ठेवा भजनं. पेस्तनचाचा, आपण एकत्र प्रवास करत होतो, तेव्हा तुम्ही काही तरी गुणगुणत होतात. ते फक्त चाचींसाठी असतं का?" भाई.
सगळे हसतात.
"ए भाऊसाब, तू साला माजा मजाक करते हां. समद्यांसाठी गायेल हिंदी फिल्मसाँग. पण तुम्हाला भावेल काय?" पेस्तनचाचा.
"हंड्रेडपर्सेंट भावेल." भाई.
पुन्हा सगळे हसतात.
"हा पेस्त्या जावयबापूना दोस्त म्हणतो आणि शिव्या देतो. वाटत नाय काय तुला?" अंतूकाका.
"अरे अंतूजी, मी प्यारसे साला बोलते. नेव्हर माईंड." पेस्तनचाचा.
भाई हळूच म्हणाले, "आपले कडवेकर मामा आहेतच की पट्टीचे गवय्ये." भाई.
कडवेकर मामांचा चेहरा खुलला. त्यांच्या नावाचा उल्लेख न झाल्यामुळें ते खाली मान घालून बसले होते. कडवेकर मामींनी प्रतिक्रिया दिली नाही असे होऊच शकत नाही.

"आमचं हजबंड रँ रँ करुन क्लासिकल गातंय. कान दुखतंय बघा भाई. पण नाटकातली गाणी चांगली गातंय ते." मामी.
कधी नव्हे ते मामींच्या तोंडून स्तुती ऐकून मामा चक्क लाजले आणि सगळे खो खो हसत सुटले.
"चालेल. मामा गातील नाटकातली गाणी. सखाराम, तू काय करशील रे?" भाई.
"ह्या चिरगुटाला काय येतय? सारखा नमस्कार करतो. तोंडात दातांच्या ऐवजी छापखान्याचे खिळे बसवलेत. कसले शब्द बाहेर पडतात, ते डोक्यावरून जातात." बबडू.
"सखाराम, तू इतिहासातला उतारा वाचून दाखवशील का?" हरीतात्या.
"रडगाणं असेल तर छान जमेल त्याला." चितळेगुरूजी.
"मी विचार करून ठरवतो.
हे वाक्य उच्चारण्यासाठी सख्याने विचारांची पराकाष्ठा केली होती.
सगळे टर उडवित असले तरी भाई सखारामला पाठीशी घालीत.
"करेल तो. पण मंडळी, आता वेळ संपत आली आहे. मला इंद्रदेवांनी एवढाच वेळ दिला होता. 'स्पेशल रिक्वेस्ट' केली होती म्हणून." भाई.
"एकदम हटके झाली रे आजची मिटींग स्कालर." बबडूने प्रतिसाद दिला.
"खूप दिवसांनी माणसात असल्यासारखे वाटले हो जावयबापू." अंतूकाका.
"तुम्ही सुध्दा तुमच्या सोसायटीत करु शकता." भाई.
"भाऊ, ते समदा टेक्नॉलॉजी कोणाला येते? समदा छोकरालोक ऑनलाईन काय काय करते. मला समजावते नाय साला."
"होय ना. आम्हाला फोन घेणे, करणे, वाटस्अप एवढच येतं." हरीतात्या.
"स्काईपवर मुलं येतात आठवड्यातून एकदा म्हणून ते जमतं. नाही तर ही यंत्रं फुकट." बबडू.
"असं नाही. आता हळूहळू आपण ह्यांचा वापर करु. आज तुम्हाला बरं वाटलं ना?" भाई.
"खूप बरे वाटले हो पुर्ष्या. असाच बोलवित जा आम्हाला. शाळेत होतास तस्साच आहेस." चितळेगुरूजी.
"मला सुध्दा खूप बरं वाटलं. मन भरून आलयं. वाटतंय आनंद पोटात माज्या माईना." कडवेकर.
सगळे गातात, "आनंद पोटात माज्या माईना."
----------------------------
"भाई, रात्री झोपेत कुठला आनंद तुझ्या पोटात मावत नाही आहे?"
"सुनिता, आपलं गणगोत कुठे गेलं?" भाई.
"तू स्वप्नात गणगोत २ असं पुस्तक लिहीत होतास की काय?" सुनिता बाई.
"नाही गं. माझ्या व्यक्ती आणि वल्ली जमल्या होत्या इथे. आम्ही खूप मजा केली. तुला झोपेशिवाय काही सुचतं का? खूप काही ठरवलं. तब्येत खूष झाली सर्वांची." भाई.
"भाई, तू स्वप्नात काहीतरी पाहतोस आणि ते सत्यात असल्यासारखा वागतोस." सुनिताबाई

"सुनिता, तू उडव माझी खिल्ली. पण ह्या लॉकडाऊनच्या काळात माझ्या गणगोताला मानसिक उभारीची गरज आहे. ते सगळे मला मनापासून साद घालतायत. मला आतून जाणवतंय ते. मला गेलं पाहिजे. इंद्रदेवांकडे विनवणी करतो. तू येणार का?"

"विचारतोस काय? तू तिथे मी. नक्की जाऊ आपण."

"खूप आनंद झाला मला. उद्या सकाळी माडगूळकर अण्णा आणि बाबूजी फडकेनासुध्दा विचारतो. मग ठरलं, मी पुन्हा येईन. आता झोपतो."

हसत हसत भाई झोपी जातात. त्यांच्या डोक्यावरून हलकेच हात फिरवून सुनिता बाई म्हणतात, "भाई, तुझ्यातलं हे निरागस बालकच मला खूप भावलं. त्याच्यावरच मी मनापासून प्रेम केलं, करते आणि करेन."

जीवनातली घडी अशीच राहू दे.

--------------------------------

**प्रा. रेखा विनायक नाबर**